# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्र. 53/2024 दिनांक : 07.02.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**भाग्यनगर :–** दिनांक 05.02.2024 रोजी 01.30 वा. चे सुमारास, **समतानगर, नांदेड येथे**, यातील फिर्यादीस तुला वारंवार सांगुन देखील आमचे विरूध्द केलेली केस माघे का घेत नाहीस तुला खतम करून टाकतो असे म्हणुन यातील नमुद पाच व इतर चार अनोळखी आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीचे राहते घराचा दरवाजा लाथानी तोडुन घरात घुसून फिर्यादीस हातातील तलवारीने मानेवर मारून खुन करण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादी खाली वाकला असल्याने वार चुकला पुन्हा फिर्यादीस तलवार मारण्यासाठी उगारली त्यावेळी फिर्यादीचे आई,वडील,पत्नी,भाऊ भावाची पत्नी यांनी आरडा ओरड केल्याने गल्लीतील लोक जागे झाले त्यावेळी आरोपी मोटार सायकलवर बसुन निघून गेले. वगैरे **फिर्यादी देवानंद गंगाधर मोगल, वय 28 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. समतानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 37/2024 कलम 307,143,147,148,149,450,323 भादवी सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चव्हाण, मो.क्रं. 7020408595** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**विमानतळ :–**दिनांक 05.01.2024 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **माळटेकडी पुलाखाली, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा गाडेगाव कामठा येथुन नांदेड कडे मोटारसायकलने जात असतांना यातील अज्ञात तीन त्यात एक सरदारजी असलेला आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस खंजरचा धाक दाखवुन फिर्यादीची बॅक हिसकावून घेवून त्यांतील लॅपटॉप किंमती 20,000/–रूपयाचा व नगदी 35,000/–रूपये असा एकुण 55,000/–रूपयाचा माल जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संतोष राजु खोसडे, वय 31 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी सेतु सुविधा केंद्र ऑपरेटर रा. नाथनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 28/2024 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री शिवाजी गुरमे, मो. नं. 9420437720** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)अर्धापूर :–**दिनांक 05.02.2024 रोजी 16.15 वा. चे सुमारास, **चक्रधर यांचे धाब्यावर लोणी खु. ता. अर्धापूर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व आरोपी हे गावातील धाब्यावर दारू पित बसले होते यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे बहिणीवर शिवी दिली असता फिर्यादीने आरोपीस तू बहिणीवर शिवी का देतो असे विचारपूस करीत असताना आरोपीने शिवीगाळ करून हातातील लाकूड घेवून फिर्यादीचे पायावर मारहाण करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी सुनील देविदास लोणे, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. लोणी खु. ता. अर्धापूर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 43/2024 कलम 325,323,504 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2544 बोईनवाड, मो. नं. 9529971005** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 04.02.2024 रोजी 20.15 वा. चे सुमारास, **अन्सारी हॉस्पिटल वसरणी ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीस डीशचे कामाचे पाचशे रूपये देण्याचे कारणावरून यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून हॉकी स्टिकने व लोखंडी पंचने फिर्यादीचे उजव्या पायाच्या मांडीवर डोक्याच्या पाठीमागुन उजव्या गालावर मारहाण करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी शेख रफीक शेख पाशमिया, वय 24 वर्षे, व्यवसाय व्यापर रा. आकाशवाणी केंद्र वसरणी ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 95/2024 कलम 326,504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2141 मोरे, मो. नं. 9823236453** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :–

**देगलूर :–** दिनांक 06.02.2024 रोजी 07.20 वा. चे सुमारास, **मंडगी फाटा ते मंडगी जवळ ता. देगलूर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने त्याचे होलॅड कंपनीचा विना नंबरचा ट्रॅक्टर मध्ये विनापरवाना बेकायदेशिर पणे नैसर्गिक गौण खनीज लाल वाळु अंदाजे एक ब्रास किंमती 4000/–रूपयाची चोरून नेत असताना मिळुन आला, फिर्यादी त्याचे कर्तव्य बजावत असतांना आरोपीने शासकीय कामात अडथळा निर्माण करून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवून ट्रॅक्टर घेवून पळून गेला. वगैरे **फिर्यादी विजय रूक्षराज तांदळे, वय 38 वर्षे व्यवसाय तलाठी सज्जा सांगवी उमर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 51/2024 कलम 353,379,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.क्रं. 8275266564** हे करीत आहेत.

## 5)आत्महत्येस प्रवृत्त केले :—

**भाग्यनगर** :—दिनांक 05.02.2024 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घरी संभाजीनगर, तरोडा बु. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे **मयत पती नामे रघुनाथ भुजंग ताटे, वय 50 वर्षे, रा. संभाजीनगर, तरोडा बु. नांदेड** यांना आमचा प्लॉट आम्हाला परत कर नाहीतर 40 लाख रूपये दे नाहीतर तु मरून जा मग आम्हाला प्लॉट मिळेल तु मरून जा असे वारंवार त्रास देवून जिवे मारण्याची धमकी देत असल्याने फिर्यादीचे पती यांनी आरोपींचे त्रासाला कंटाळून फाशी घेवून आत्महत्या केली त्यांना आत्महत्येस यातील नमुद आरोपीतांनी प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी किर्ती रघुनाथ ताटे, वय 42 वर्षे, व्यवसाय शिक्षिका रा. संभाजीनगर, तरोडा बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 38/2024 कलम 306,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री** सिंगनवाड, **मो.नं. 75885268833** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :—

**1)इतवारा** :—दिनांक 05.02.2024 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **शास्त्री मार्केट लोहार गल्ली जाणारे सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद एक व एक विधीसंघर्षग्रस्त बालक या आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या एक लोखंडी तलवार आपले ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री देविदास बाबूराव बिसाडे, ने. पोस्टे इतवारा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 36/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1207 बेडदे, मो.क्रं. 8805811521** हे करीत आहेत.

**2)इतवारा** :—दिनांक 06.02.2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **देगलूर नाका ते मालटेकडी जाणारे सार्वजनिक रोडवर खुगा मज्जिद जवळ देगलूर नाका, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या एक सिल्वर रंगाचा गावठी कट्टा—पिस्तुल किंमती 10,000/—रूपयाचा आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/802 शेख वाजीद शेख मंजूर, ने. पोस्टे इतवारा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 37/2024 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्रं.** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**धर्माबाद** :—दिनांक 05.02.2024 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **धर्माबाद शहरातील मार्कडेय मंदिराचे पूर्व बाजूस असलेल्या झाडमध्ये मोकळया जागेत ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 3900/—रुपये तसेच तीन मोटार सायकल एकुण किंमती 1,30,000/—रूपयाच्या व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/1135 संतोष गंगाधर संगेवार, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 23/2024 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1181 कुमरे, मो.क्रं. 8208788324** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**माहुर** :— दिनांक 06.02.2024 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी मौजे तांदळा ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी दारू किंमती 2000/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1236 प्रशांत उमाकांत भोपळे, ने. पोस्टे माहुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 15/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोहेकॉ/1326 चौधरी, मो.नं. 9158134034** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड